11 FEB 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युनोचे संविधान करण्यात रोटरीचा वाटा

## आनंद कुलकर्णी : राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात मॉडेल युनायटेड नेशन्सचे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : संयुक्त राष्ट्रसंघाचे संविधान तयार करण्यात रोटरीचा वाटा महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन रोटरी ३१७० चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आनंद कुलकर्णी यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग व रोटरी क्लब ऑफ करवीरतर्फे आयोजित मॉडेल युनायटेड नेशन्सच्या (मून-२०१८) उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी छत्रपती शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले आहे.

श्री. कुलकर्णी म्हणाले, ''संयुक्त राष्ट्र संघामध्ये सहभागी देशांपेक्षा अधिक देशात रोटरी कार्यरत आहे. समाजातील विविध प्रश्नांवर विधायक काम करण्यासाठी रोटरी नेहमी पुढाकार घेते. मूनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतून नेतृत्व विकसित व्हावे, हा उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रश्नांची जाण येऊन त्यांनी भविष्यात देशाच्या विकासास हातभार लावणे आवश्यक आहे.''

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार म्हणाले, ''आंतरराष्ट्रीय स्तरासारखे व्यासपीठ उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थी आपापली मते कशा पद्धतीने व्यक्त करतात, याचा अनुभव घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतला हा महत्त्वाचा टप्पा आहे.''

प्रा. डॉ. भारती पाटील म्हणाल्या, ''राज्यशास्त्र अधिविभाग रोटरीसोबत विविध उपक्रम घेण्यास नेहमीच उत्सुक असतो. मूनचे राज्यशास्त्र अधिविभागाच्या सहयोगातून यंदा तिसऱ्यांदा आयोजन केले आहे. युवा पिढीला प्रेरणा देण्यासाठी रोटरीने असे उपक्रम आखल्यास राज्यशास्त्र अधिविभाग त्यास अवश्य सहकार्य करेल.''



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग व रोटरी क्लब ऑफ करवीरतर्फे आयोजित मॉडेल युनायटेड नेशन्स उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी. शेजारी आनंद कुलकर्णी, प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ. भारती पाटील, हृषिकेत केमकर, नासीर बोरसदवाला, विशाल जांभळे, निशिकांत नलवडे, दिलीप शेवाळे आदी.

खंड सल्लागार म्हणून विक्रांतसिंह कदम, प्रशांत मेहता, अमित मोरे, वारणा वडगावकर, श्री. केमकर, तर न्यायाधीश म्हणून विशाखा आपटे, सोनल जोशी, नेहा वाडेकर, विवेक धुपदाळे काम पाहत आहेत.

याप्रसंगी असिस्टंट गव्हर्नर हृषिकेत केमकर, निशिकांत नलवडे, दिलीप शेवाळे, मनोज कोळेकर, मोनिका कल्लोळी, डॉ. नितीन माळी, संभाजी पाटील, दिनकर अधिक, हरेश पटेल, नवीन पटेल, संजय पाटील, शीतल दुगे, स्वप्नील कांबळे, अंकुश कारंडे, दिलीप प्रधाने, चंद्रकांत कागले, सुभाष आलेकर उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ करवीरचे अध्यक्ष विशाल जांभळे यांनी स्वागत केले. प्रमोद चौगले यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संयुक्त राष्ट्रसंघांच्या प्रतिनिधींनी त्या त्या देशाची वेशभूषा परिधान करून विद्यापीठ परिसरातून फेरी काढली. त्यांच्या हातात त्या त्या देशांचे ध्वज होते. मुख्य इमारतीपासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला प्रदक्षिणा मारून फेरीचा समारोप झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2018
लोकमत

# विद्यार्थ्यांनी नवीन कल्पना आत्मसात कराव्यात

## कुलकर्णी : विद्यापीठात 'मून'चे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रत्येक देशाची ताकद ही त्यांच्या देशातील युवक असतात. जागतिक स्तरांवर होणारे अमली पदार्थांचे सेवन, महिला आणि बाल अत्याचार, इतर देशांचा अण्विक साठा याबाबतच्या धोरणांवर विचारमंथन होऊन युनेस्को याच युवकांकडून नवीन कल्पना आत्मसात करु पाहते. यासाठी विद्यार्थ्यांनी त्या धोरणांचा तुलनात्मक, नियोजन पद्धतीने अभ्यास करुन स्वत:ला जागतिक पातळीवर सिद्ध करावे, असे आवाहन 'रोटरी'चे जिल्हा गव्हर्नर आनंद कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर आयोजित मून स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्हीवो-संयुक्त राष्ट्रांच्या युनेस्कोच्या धोरणानुसार जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी विविध देशांतून प्रयत्न केले जातात. याचाच एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्यावतीने मॉडेल युनायटेड नेशन या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

स्पर्धेसाठी राज्यासह कर्नाटकातून ३६ संघांतून ७२ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेसाठी प्रत्येक देशाची वेशभूषा करून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. यावेळी राज्यशास्त्र विभागाच्या डॉ. भारती पाटील, विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, नासिर बोरसदवाला, विशाल जांभळे, शीतल दिग्गे, प्रमोद चौगुले, आदी उपस्थित होते.

11 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठाचे सारे काही एका क्लिकवर

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरणाऱ्या शिवाजी विद्यापीठातील सर्व कामकाजापासून ते संलग्न महाविद्यालयांशी होणारा पत्रव्यवहार ऑनलाइन सुरू असल्यामुळे वेळ व कागदाची बचत होत आहे. परीक्षा अर्ज ऑनलाइनपद्धतीने भरून घेतले जातात. विद्यापीठात प्राध्यापकपदापासून ते इतर क्लार्कपदासाठी जी भरती केली जाते त्यासाठी अर्ज करणे, निवडलेल्या अर्जदारांना मुलाखतीसाठी सूचना देणे या गोष्टीही विद्यापीठ प्रशासनाच्या माध्यमातून ऑनलाइन केल्या जात आहेत. यासाठी ईमेल तंत्राचा वापर सुरळीतपणे सुरू आहे. परीक्षा विभागातर्फे होणारी प्रक्रिया ऑनलाइन राबवली जात असल्यामुळे डेटा संकलित केला जातो.